# UGC Journal Details

| | |
|---|---|
| **Name of the Journal :** | Research Journey |
| **ISSN Number :** | |
| **e-ISSN Number :** | 23487143 |
| **Source:** | UNIV |
| **Subject:** | Marathi |
| **Publisher:** | Swatidhan International Publication |
| **Country of Publication:** | India |
| **Broad Subject Category:** | Multidisciplinary |

Print

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

(https://www.ugc.ac.in/) (https://www.ugc.ac.in/faq.aspx)
RTI (https://www.ugc.ac.in/subpage/RTI-Act.aspx)
Tenders (https://www.ugc.ac.in/Tenders.aspx)
Jobs (https://www.ugc.ac.in/ugc_jobs.aspx)
Press Release (https://www.ugc.ac.in/ugc_pressrelease.aspx)
Contact Us (https://www.ugc.ac.in/contact.aspx) अ (https://www.ugc.ac.in/hindi/)

# UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for r

**Total Journals : 1436**

Show 25 entries Search: Research journey

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=) | 1168 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=) | 1220 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

## For UGC Officials

- e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)
- NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)
- RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)
- PG portal (https://pgportal.gov.in)

IQAC OFFICE KAN Naik Arts, Commerce & Science College

# साहित्याचे समाजशास्त्रीय संशोधन

डॉ. पौर्णिमा बोडके
नाशिक

## प्रस्तावना

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. प्रत्येक देशाचे साहित्य हे त्या देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेचे प्रतिबिंब असते. समाज आणि संस्कृती हे एकमेकांच्या सान्निध्यात विकसित होणाऱ्या परस्परावलंबी गोष्टी आहेत. साहित्यकृती व समाजरचना ह्यांचा परस्पर संबंध हा दोन्ही ठिकाणी प्रकट झालेला असतो. साहित्यकृतीचा प्रभाव हा त्या समाजाच्या अंतर्भूत मूलगामी मूल्याधिष्टीत आकृतिबंधावर अवलंबून असते. थोडक्यात संस्कृती संवर्धनात या दोहोंचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे॰ उदा. कादंबरी हा वास्तवनिष्ट साहित्यप्रकार आहे. प्रत्येक वेळेला वाचक हा नेहमी वास्तव जीवनदर्शनाची अपेक्षा करतो. लेखक विशिष्ट अनुभवाच्या माध्यमातून सार्वकालिक जीवनमूल्याचा आविष्कार करतो. तो अनुभव कादंबरीच्या प्रकार स्वरूपाला साजेसा असायला हवा. त्यातूनच कादंबरीतील जीवनांनुभवाला सौंदर्यमूल्य प्राप्त होते. त्या सौंदर्यमूल्यातून जीवनसत्याची अनुभूति येते. तेव्हाच वाचकाला साहित्यकृती वास्तववादी असल्याचे मान्य होते. येथेच साहित्याचे समाजशास्त्र दडलेले आहे. डॉ. मिलिंद मालशे यांनी दिलेल्या 'साहित्याच्या पायाभूत करार" या संकल्पनेनुसार 'कथन करणे' हा कादंबरीचा करार सांगितला जातो. म्हणजेच कथानात्मक या साहित्याच्या मूलभूत प्रवृत्तीत 'कादंबरी' हा प्रकार मोडतो. यातून कादंबरीकार त्याने अनुभवलेल्या जीवनाचे त्रयस्थपणे कथन करत असतो. म्हणून या प्रकाराला आत्मनिष्ठ म्हणता येत नाही. कादंबरीत येणाऱ्या या जीवनपट एका विशिष्ट काळाचे दर्शन घडवत असतो.

## साहित्याचे समाजशास्त्र: एक अभ्यासशाखा

समाजशास्त्रामध्ये 'समाज', 'संस्कृती' आणि 'साहित्य' या सर्वांचा समावेश होतो. ही संकल्पना अतिशय व्यापक आहे. साहित्यकृती या माणसाच्या जैविक आणि सांस्कृतिक विकासक्रमांच्या इतिहासावर दृष्टी टाकतात. यावरून समाजाचे स्वरूप, समाज परिवर्तनाचे प्रकार, त्याची कारणे इत्यादींचा विविध पातळयांवर शोध घेतला जातो. ओघानेच साहित्य प्रयोजनाच्या पुढील चर्चेचा भक्कम पाया घालून देतात. उदा. डॉ. र. बा. मंचरकर संतांचे सांस्कृतिक पर्यावरण काय होते, त्यामुळे संत साहित्याची निर्मिती कशी झाली हे सांगतात. संतांची चिकित्सक वृत्ती, अनुभवाचे महत्त्व, माणसात दैव शोधणं इ. अनेक गोष्टींमुळे त्यांच्या साहित्यातही कसे परिवर्तन झाले आहे याचा त्यांनी आढावा घेतला आहे.

**या अभ्यासशाखेत** साहित्य व समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास केला जातो. साहित्य हे समाज सापेक्ष असते; तर समाजाचे स्वरूप व रचना ह्या साहित्याच्या माध्यमातून रूपांतरित होतात. साहित्य निर्मितीवर जसा सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम होतो, तसाच साहित्यकृतींचाही समाजमनावर परिणाम होतो. हे कसे घडते? नैतिक मूल्यांमध्ये साहित्य-कृती बदल घडवतात का? या प्रश्नांकडे हा 'वासुदेव मुलाटे गौरव-ग्रंथ' निर्देश करतो. साहित्याचा आशय व विषय हे समाजनिर्मित असतात; तर समाजाचे अंतरंग साहित्यात बघावयास मिळते. परंतु साहित्यनिर्मिती हि वास्तवापेक्षा नक्कीच वेगळी असते; वास्तवात अनेक घटकांच्या माध्यमातून समाजनिर्मिती अजमावली जाते. याउलट साहित्यात विशिष्ट रूपबंधाच्या परंपरागत संहितेच्या तत्वांना आधीन राहून लेखकाला समाजाभिमुख सौंदर्यनिर्मिती केली जाते. ही संहिता तत्वे प्रत्येक साहित्यप्रकारानुसार ठरवली गेलेली आहेत. त्यालाच साहित्याचे समाजशास्त्र

म्हटले जाते. डॉ. आनंद यादव यांचा 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती' हा तिसरा समीक्षा ग्रंथ. या ग्रंथात त्यांनी मराठी साहित्याचा मराठी समाजाशी आणि संस्कृतीशी कोणकोणत्या प्रकारचा संबंध असतो, त्या संबंधातून कोणकोणते वाङ्‌मयीन प्रश्न उपस्थित होतात,त्या प्रश्नांना कोणकोणत्या दृष्टीने सामोरे जावे लागते, याची मीमांसा मराठी साहित्यातील वस्तुस्थितीच्या आधारे केलेली आहे.

**साहित्याभ्यासातील समाजशात्रीय दृष्टीकोण**

साहित्य व समाज यांचे परस्परसंबंध सर्व मान्य आहेत. त्यासाठी लेखकाची सामाजिकता, वाचकाची सामाजिकता, आणि वा:ङ्मयातील सामाजिकता या बाबीवर विशेष लक्ष दिले जाते. लेखकाचा समाजनिष्ट विचार व वाचक-साहित्य सहसंबंध यांचा सखोल विचार येथे अपेक्षित आहे. यात आशय, कालखंड, व लेखक हे परस्परावलंबी घटकांचा अभ्यास केला जातो. साहित्यप्रकारानुरूप सामाजिक मूल्ये, आशय विश्लेषण करण्याची पद्धती व सामाजिक परिस्थिति यातून साहित्याचे समाजशास्त्र प्रकट होते.

**साहित्यातील समाज**

प्रत्येक साहित्यकृती ही विशिष्ट काळातील समाज रचना, नीतीतत्वे, ध्येयधोरणे, विचारयंत्रणा, आणि घटनाक्रमांची कलात्मक मांडणी करते. त्यानुसार साहित्याचे वर्गीकरण केले जाते. जसे प्राचीन साहित्य, ऐतिहासिक किंवा पौराणिक साहित्य, आधुनिक किंवा अत्याधुनिक साहित्य; तसेच लोकसाहित्य, संत साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, इत्यादी. स्थलकालपरत्वे साहित्याचे गटवार विभाजन केलेले आहे. लेखकाच्या दृष्टीकोणांनुसार वास्तव किंवा कल्पना चित्र साकारलेले असते त्यातून सामाजिक, धार्मिक, राजकीय, मानसशास्त्रीय अशा वर्गीकरणातून साहित्य अभ्यासले जाते. समाजातील स्त्री, पुरुष, लहानथोर, सण-उत्सव, व्रत-वैकल्ये, चालीरीती, घटना प्रसंग, प्रगतिच्या संकल्पना इत्यादीच्या माध्यमातून समाजाचे अपेक्षित चित्र उभे केले जाते.

RESEARCHJOURNEY

तथापि, साहित्यकृतीतील पात्रे, प्रसंग, घटनाक्रम, कार्यकारणभावानुसार तार्किक रचना यासर्व बाबी वास्तव घडामोडीमध्ये अनुभवास येतीलच असे नाही. साहित्य सौंदर्य निर्मितीत आवश्यक म्हणून संभवनीयतेच्या किंवा शक्यतेच्या तत्वानुसार लेखक साहित्यप्रकारानुरूप भाषिक आणि वाङ:मयीन कलाविष्कार करीत असतो. उदा. कादंबरीत पात्रांतून समाज रचना, शब्दांतून तालबद्ध, गेयताधारक काव्यनिर्मिती केली जाते.

**साहित्यिकांची कालभेदी दृष्टी**

पुण्यात झालेल्या ८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य समेलांच्या निमित्ताने 'आजचा काळ, आजचे साहित्य' या विषयावरील पुस्तक प्रकाशन प्रसंगी जेष्ठ समाजसेवक यांनी जे मत प्रकट केले ते अत्यंत महत्वाचे आहे. ते म्हणतात की काही साहित्यिकांना कालभेदी दृष्टी असते; विज्ञान क्षेत्रात काम करणारे अगोदरच्या वैज्ञानिकांच्या संशोधनाचे अवलोकन करतात; तसेच त्या क्षेत्राबद्दल साहित्यिकांनी काय लिहून ठेवलेले आहे ते जाणून घेतात. वैज्ञानिकांच्या बौद्धिक पातळीवरून त्यांना जे दिसत नाही ते मात्र साहित्यिकांना काल्पनिक पातळीवर स्पष्ट दिसते. साहित्यिक आपल्याला कालभेदी दृष्टी देतात. उदा. रविंद्रनाथ टागोर एक नृत्यनाटिका आहे- 'रक्तकरबी'. रशियातील क्रांति होण्यापूर्वी टागोरांनी रशियातील राज्यक्रांतीचं व त्यातून उद्भवणाऱ्या समश्यांचं सुंदर चित्रण केलेलं आहे. आपल्या सर्वांना कल्पना आहे की 'रामायण' घडण्याअगोदर वाल्मिकी

ऋषींनी रामकथा लिहिली. म्हणजेच साहित्यिकांना वर्तमानबरोबर भविष्यकाळही दिसतो. शेक्सपियरने विमान किंवा घड्याळाबद्दल लिहिणं ठेवले आणि शोध मात्र नंतर लागलेले आहेत. थोडक्यात, 'जे न देखे रवी ते देखे कवी' ही उक्ती खरी ठरते.

**साहित्यिकांकडून सांस्कृतिक परिवर्तन**

सामाजिक बदल हा सांस्कृतिक बदल ठरतो. आजची जगरहाटी उद्याची संस्कृती किंवा सामाजिक मूल्यांचा आधार बनतो. साहित्यिक वास्तवाबरोबर भविष्याचे चित्रण करतो; म्हणजेच अपेक्षित परिवर्तन साहित्यकृतीमध्ये आशयाचे- विषयाचे स्वरुपात मांडतात. विचार सामान्य असो की असामान्य, तो किती प्रभावीपणे जनमाणसांसमोर आणला जातो यावर बदल शक्य होतो. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे व सांस्कृतिक बदलाचे माध्यम आहे. यासाठी समाजातील स्त्री, पुरुष, लहानथोर, सण-उत्सव, व्रत-वैकल्ये, चालीरीती, घटना प्रसंग, प्रगतिच्या संकल्पना अशा सर्व घटकांचा साधन म्हणून वापरली जातात. बदलत्या काळाबरोबर योग्य-अयोग्य अनुबंधाचा उलगडा साहित्यिकांकडून मांडला जातो आणि त्यातूनच समाजाचे बदलते चित्र दिसते, नव्हे साकारले जाते. कोणत्या बाबी जतन कराव्यात आणि कोणत्या बदलाव्यात हे सृजनशील साहित्यिकांच्या लेखणीतून शक्य होते ही अपेक्षा डॉ. अभय बंग यांनीही स्पष्ट केलेली आहे.

**सामाजिक साहित्य समीक्षा**

सैद्धांतिक पद्धतीने विचार करता साहित्यनिर्मितीमध्ये अनेक सामाजिक विचारसरणी अंतर्भूत असतात. लेखक साहित्यकृतीमध्ये सामाजिक समीक्षा प्रकारांचा विचार करतो; जसे स्त्रीवाद, मार्क्सवाद, साम्यवाद, समाजवाद, इ. दृष्टिकोणातून लेखकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झालेली असते. २० व्या शतकात सर्वत्र सामाजिक आणि वाङ:मयीन प्रेरणा कोणत्या आहेत यांचा विचार करून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळीचे स्वरूप लक्षात घेणे महत्वाचे आहे.

RESEARCH JOURNEY

**संदर्भ**

बंग अभय, वैचारिक लेख सौजन्य : अनुभव मासिक, जून २०१०
मंचरकर र. बा. (संपादक) 'सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य' – (डॉ. वासुदेव मुलाटे- गौरवग्रंथ) पद्मगंधा प्रकाशन, पृष्ठे- ४७९,
यादव आनंद, 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती'
जाधव रा.ग., साहित्य आणि सामाजिक संदर्भ, १९७५